| MHLA120023782026 | **निशाणी क्रं.१ लगत** |
|---|---|

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७४ चा अधिनियम दोन प्रकरण एकविस अन्वये संक्षीप्त संपरिक्षा केलेली श्रीमती के.पी.गाडे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्रं.२ निलंगा , यांचे न्यायालयात**

१. अपराध घडल्याचा दिनांक – १०/०८/२०२६

२. अहवालाचा दिनांक – १०/०८/२०२६

३. फिर्यादीचे नांव वय व पत्ता – महाराष्ट सरकारतर्फे पो.स्टे. कासारसिरसी

४. आरोपीचे नांव वय व पत्ता **ललीत शंकरराव शिंगारे**,
वय– ५७ वर्षे, व्यवसाय–मजुरी
रा.तांबाळा, ता.निलंगा, जि.लातूर

५. आरोपींना समजावून सांगणेचा – मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२ (अ) प्रमाणे.

६. **तपशिल** :–

तुम्ही दिनांक १०/०८/२०२६ रोजी १३.०० वाजणेचे सुमारास मौजे तांबाळा येथे तांबाळावाडी कडे जाणारे रोडवर समाज मंदीराचे बाजुस मोकळया जागेत तुम्ही तुमच्या स्वतःच्या फायदयाकरीता कल्याण नावाचा जुगार खेळताना मिळून आला. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या दखलगिरीत घडला आहे. आरोपीला आरोप वाचून दाखविणेत आला व समजाविणेत आला.

७. **आरोपीचे प्रतिकथन**

प्र. १ तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर होय.

प्र. २ दोषारोपातील आरोप तुम्हाला वाचून व समजावून सांगितले ते तुम्हाला समजले काय ?

उत्तर होय.

प्र. ३ तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर होय, मला गुन्हा कबूल आहे.

दिनांक ११/०८/२०२६ समोर,

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.08.11 17:49:41 +0530

....................

आरोपींची सही

(श्रीमती के.पी.गाडे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) निलंगा

आरोपींनी सदरचा गुन्हा स्वच्छेने कबूल केलेला आहे. त्याने जर का गुन्हा कबुल केला तर त्यानंतर होणारे परिणाम त्यांना समजावून सांगण्यात आले. तरीदेखील त्यांना गुन्हा कबुल असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर आरोपींचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपींनी असे कथन केले की, तो त्याच्या कुटुंबातील एकमेव कमवती व्यक्ती आहे व तो दंड भरणेस तयार आहे. तरी त्याला कमीत कमी शिक्षा व्हावी. गुन्हयाचे स्वरुप पाहता खालील प्रमाणे आदेशित केलेली शिक्षा न्यायसंगत दिसून येते.

## <u>आदेश</u>

| |
|---|
| **१.** आरोपी **ललीत शंकरराव शिंगारे** रा.तांबाळा, ता.निलंगा, जि.लातूर यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२ (अ) प्रमाणे केलेल्या अपराधामध्ये दोषी धरणेत येते असून त्यांना सदर गुन्हयाकरीता न्यायालय कामकाजाची वेळ संपेपर्यंत साधा कारावास व रक्कम रुपये २००/-(रुपये दोनशे फक्त) दंड अशी शिक्षा सुनावणेत येत आहे. वरील |

| |
|---|
| दंडाची रक्कम न भरल्यास ३ दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा सुनावणेत येत आहे. |
| २. प्रस्तुत कामी जप्त असलेला मुद्देमाल आकडेमोड केलेल्या चिठ्ठया मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावी व रोख रक्कम रू.६८०/– अपील कालावधीनंतर सरकार जमा करणेत यावी. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.08.11 17:49:36 +0530

दि.११/०८/२०२६ (**श्रीमती के.पी.गाडे**)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,(न्यायालय क्र.२) निलंगा